# डॉक्टरांच्या उत्पन्नावर कायद्याची करडी नजर

## दोषींना ५० हजार रुपये दंड आणि दोन वर्षे कारावास

प्रतिनिधी, मुंबई

**डॉक्टरांच्या वाढत्या** 'कट प्रॅक्टिस'ला आळा घालण्याची तयारी सुरू झाली असून डॉक्टरांचे उत्पन्न व खर्च यातील प्रमाणबद्धता तपासण्यासाठी 'कट प्रॅक्टिस' कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची दुसरी बैठक शनिवारी ८ जुलै रोजी पार पडली. या कायद्यानुसार आरोग्य सेवा पुरविणाऱ्या सर्वच कंपन्या व डॉक्टरांवर कायद्याची करडी नजर असणार आहे.

'एशियन हार्ट इन्स्टिट्यूट'ने डॉक्टरांच्या कट प्रॅक्टिस विरोधात मोहीम सुरू केल्यानंतर राज्य सरकारने याची दखल घेत 'कट प्रॅक्टिस' या गंभीर विषयावर तोडगा काढण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली. अॅक्युपंक्चर, अॅलोपथी, युनानी, आयुर्वेदिक अशा सर्वच क्षेत्रांतील आरोग्य सेवा पुरविणाऱ्या डॉक्टरांचा यात समावेश आहे. याअंतर्गत दोषी डॉक्टरांना शिक्षा देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचीही मोठी भूमिका असणार आहे, असे या समितीचे सदस्य डॉ. हिंमतराव बावीस्कर यांनी सांगितले. डॉक्टरांचे उत्पन्न व् त्यांचा खर्च यात प्रमाणबद्धता नसल्यास दोषी डॉक्टरांना ५० हजार रुपयांचा दंड आणि २ वर्षांचा कारावास ही शिक्षा असणार आहे. मात्र डॉक्टरांविरोधातील तक्रारदाराला आपण केलेले आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे सादर करावे लागतील, असे डॉ. बावीस्कर यांनी सांगितले.

राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीत महाडचे डॉ. हिंमतराव बावस्कर, राज्याचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित, पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांचे अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे, प्रिन्स अली खान रुग्णालयाचे संचालक डॉ. संजय ओक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे डॉ. अभय चौधरी, एशियन हार्ट इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष डॉ. रमाकांत पांडा, बालरोगतज्ज्ञ डॉ. यशवंत आमडेकर, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. अमित कारखानीस आणि अन्य वकिलांचाही समावेश आहे.